महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com
फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२
दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२

दि. ०५/१२/२०२४

क्रमांक -ससं/उशि/Key Initiatives Workshop/२०२४/18260

प्रति,

प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित /कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,
विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे विभाग.**

विषय -"**Key Initiatives and Reforms in Higher Education**" **या कार्यशाळेच्या अनुषंगाने झालेल्या सादरीकरणास सर्व संबंधित घटकांसमोर सादर करणेबाबत..**

संदर्भ - १. मा. संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/राशैधो/२०२४/५०९८-
दि. २८.११.२०२४.
२. दि. २५-२६ नोव्हेंबर २०२४ रोजी सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली राज्यस्तरीय कार्यशाळा.

उपरोक्त विषयाबाबत दिनांक २५ व २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई येथे मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेमध्ये मा. प्रधान सचिव, यांनी राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या अमुलाग्र बदलांची आणि भविष्यात होणा-या सुधारणा व बदलाबाबत सादरीकरण केले तसेच उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक, शासकीय व प्रशासकीय उपकरणांबाबत संचालनालयाचे सादरीकरण करण्यात आले.

सदर दोन्ही सादरीकरण अशासकीय महाविद्यालयांचे प्राचार्य / संचालक व इतर सर्व संबंधित घटक यांना उच्च शिक्षण क्षेत्रातील सुधारणा व बदलांबाबतची माहिती व्हावी या उद्देशाने **दिनांक १३ डिसेंबर, २०२४** रोजी **प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी सभागृह, मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय परीसर, मॉडर्न महाविद्यालय रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५** येथे करण्यात येणार आहे. त्यामुळे **शुक्रवार दिनांक १३.१२.२०२४** रोजी विभागातील **सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व इतर सर्व संबंधित घटक** यांनी **सकाळी ११.००** वाजता **सदर ठिकाणी न चुकता उपस्थित रहावे.** सदरची उपस्थिती अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी.

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,म.रा., पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.